**जिल्हा परिषद,यवतमाळ**
**कार्यालय, शिक्षण विभाग, प्राथमिक**
**दुसरा माळा, प्रशासकीय इमारत आर्णी रोड, यवतमाळ**

E-mail – eopriytl@gmail.com दुरध्वनी क्र. 07232244295-

---

जा/क्र.यजिप.शिविप्रा-आस्था/१ /कावि/६३८७/२०२४ यवतमाळ दिनांक २१/०८/२०२४

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ मुलाखती शिवाय पदनिवडीचा विकल्प दिलेल्या संस्थांमध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक पदभरती निवड यादीतील उमेदवारांच्या पदस्थापने बाबत व पुढील आवश्यक कार्यवाहीबाबत.

## जाहीर सुचना

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद यवतमाळ द्वारा शिक्षक पदभरती करिता पवित्र प्रणाली वर दिलेल्या उर्दू माध्यम -२८ पदांची जाहिरात देण्यात आलेली होती. सदर जाहिरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ यामध्ये प्राप्त गुणांच्या आधारे पवित्र प्रणाली वर एकूण उर्दू माध्यम -१३ उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर यादीनुसार मुळ दस्तऐवजाची तपासणी करिता शिक्षण विभाग (प्राथमिक), जि.प. यवतमाळ येथे उपस्थित राहण्याबाबत उमेदवारांना खालील प्रमाणे वेळापत्रक देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | पवित्र प्रणालीवर प्रसिद्ध यादीतील उमेदवाराचा अ.क्र. | मुळ कागदपत्रे तपासणी करिता उपस्थित राहण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | अ.क्र. १ ते १३ (सर्व उमेदवार) | २३/०८/२०२४ |

वरील प्रमाणे पवित्र पोर्टलनुसार उर्दू माध्यम -१३ उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानुसार संबंधित उमेदवारांना दस्तऐवजाची तपासणी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे पथक करून मूळ दस्तऐवजाची तपासणी करण्याचे नियोजित आहे. सदर दस्ताऐवज तपासणीस दिनांक २३/०८/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मूळ कागदपत्रासह शिक्षण विभाग (प्राथमिक), जि.प. यवतमाळ येथे न चुकता उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात येत आहे.

**(शिक्षणाधिकारी प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**प्रतिलिपी :-**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.